

# प्रत्येकाचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होईल : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

## जिल्ह्यात २७ हजार ४१३ व्यक्तींना घरकुल मंजुरीपत्रांचे वितरण





■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुस-या टप्प्यात जिल्ह्यातील २७ हजार ४१३ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीपत्र, तसेच २१ हजार ६२७ लाभार्थ्यांना पहिल्या हप्ता मिळाला आहे. अद्यापही ज्यांना घर नाही अशा जिल्ह्यातील प्रत्येक गरजू व्यक्तीला आवास योजनेतून हक्काचे घर मिळवून देऊ, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली.

राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्र वितरण, १० लाख व्यक्तींना पहिला हप्ता वितरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यक्रमात झाले. पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय 'गृहोत्सव'-कार्यक्रमात जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात मंजुरीपत्र वितरण झाले. सिव्हील लाईन येथील जि.प.संविधान सभागृहात हा कार्यक्रम झाला. खासदार अनुप धोत्रे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, विकास उपायुक्त राजीव फडके, जिल्हा ग्रामीण आवास योजनेचे प्रकल्प संचालक मनोज जाधव यांच्यासह अनेक अधिकारी व जिल्ह्यातील लाभार्थी बांधव उपस्थित होते.राज्यस्तरीय कार्यक्रमाचे प्रक्षेपण जिल्हास्तरीय कार्यक्रमात करण्यात आले. पालकमंत्री ॲड.फुंडकर म्हणाले की, गरीबांच्या आयुष्यात घराची संधी एकदाच येते. त्यामुळे प्रशासनाने या बाबीकडे संवेदनशीलपणे पाहिले पाहिजे. लाभार्थ्याचे घर पूर्ण होण्यासाठी त्याला फोटो अपलोड करण्यापासून सर्व प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मार्गदर्शन केले पाहिजे. गटविकास अधिकारी, ग्रामसेवक यांच्याकडून वेळोवेळी भेटी व टप्पेनिहाय आढावा घेतला जावा. योजनेच्या प्रत्येक टप्प्यावर माहिती द्यावी जेणेकरून आवश्यक तरतुदी पूर्ण होऊन काम पुढे जाईल व गरीबांचे स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण होईल. कुणाही लाभार्थ्याचे घरकुल अपूर्ण राहिले तर जबाबदारी प्रशासनावर निश्चित केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.राज्यात २० लाख व्यक्तींना एकाचवेळी घरकुल मंजुरीपत्र मिळत असून, हा दिवस ऐतिहासिक असल्याचेही त्यांनी सांगितले.खासदार श्री. धोत्रे म्हणाले की, स्वत:चे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते.

## कासोद येथील श्री.वीरभद्र तिर्थक्षेत्र येथे
# महाशिवरात्री यात्रा महोत्सवाचे आयोजन



■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

अकोट तालुक्यातील श्री वीरभद्र तिर्थक्षेत्र कासोद,अमोना येथे महाशिवरात्रीच्या पर्वावर दि २६ फेब्रुवारी रोजी ३८ व्या यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिनी सकाळी ८ वाजता श्री वीरभद्र स्वामीचे पुजन व रूद्राभिषेक होऊन संध्या.६ वाजता संस्थानच्या वतीने मान्यवरांचा सत्कार सोहळा होणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. विश्वनाथ हजारे,मा. अध्यक्ष-महाराष्ट्र वीर शैव सभा, पुणे, तसेच प्रमुख पाहूणे म्हणून एड पालकमंत्री आकाशदादा फुंडकर, आ. अमोल दादा मिटकरी, आ.प्रकाश भारसाकळे, आ.हरीषआप्पा पिंपळे, ओंकारआप्पा तोडकर खामगांव, शिवप्रसाद जटाळे,विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय मुंबई, बालमुकुंद भिरड, माजी. जि.प. अध्यक्ष, रमेशआप्पा खोबरे प्रा. डॉ. संतोष हुशे, जगनराव निचळ, प्रकाशभाऊ आतकड,एड संतोष राहाटे,अनमोल मित्तल उपविभागीय पोलीस अधिकारी, अकोट, किशोर जुनघरे,ठाणेदार अकोट ग्रामीण, एस. बी. अग्रवाल, प्रविण हुंडीवाले, बाळासाहेब बोंद्रे, सुभाषभाऊ लटकुटे, भास्करराव महाले, वासुदेवराव कोळासकर आदीं उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यात रात्री ८ वाजता प्रा. डॉ. पुर्णीमा दिवसे, कवटकार, अध्यक्षा संगीत अभ्यास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर रात्री १० वाजता श.ब्र. १०८ गुरू शिवशंकर शिवाचार्य महाराज मठ संस्थान नेर पिंगळाई या धर्म गुरूंचे प्रवचन व आर्शिवचन होणार आहे. तसेच दि २७ फेब्रुवारी रोजी स १० वाजता श्री. वीरभद्र वीरफळी महोत्सव साजरा करण्यात येईल. दुपारी ११ वाजता कुलाचाराप्रमाणे वीरभद्र स्वामीला नैवद्य अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. या यात्रा महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री. वीरभद्र तिर्थक्षेत्राचे अध्यक्ष एड. हेमंत सपाटे व सर्व पदाधिकारी वर्गाने केले.

## अकोल्याचे नवे मुख्य अभियंता राजेश नाईक ! सुहास रंगारी यांची गोंदियाला बदली



**अकोला :** महावितरणच्याअकोला परिमंडळाचे मुख्य अभियंतापदी नागपूर ग्रामीण विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश नाईक यांची पदोन्नतीवर नियुक्ती करण्यात आली आहे. अकोल्याचे मुख्य अभियंता सुहास रंगारी यांची गोंदिया येथे विनंतीवर बदली करण्यात आल्याने या रिक्त पदावर नागपूरचे राजेश नाईक यांना बढतीवर पाठविण्यात आले आहे. येत्या सोमवारी नाईक आपल्या पदाची सूत्रे स्वीकारणार असल्याचे वृत्त आहे. अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता म्हणून रंगारी यांची वर्षभरापुर्वी नियुक्ती करण्यात आली. तथापि, कार्यकाळ संपण्यापुवीच रंगारी यांनी विनंती बदली मागितल्याने अकोल्याचे पद रिक्त झाले होते. अकोल्याच्या विद्युत भवनाच्या 'वातावरणात' रंगारी कार्य करण्यास अनुत्सुक होते. त्यांच्या विनंतीनुसार रंगारी यांची गोंदियात बदली झाल्याने राजेश नाईक यांची मुख्य अभियंतापदावर नियुक्ती करयात दरम्यान, महावितरणच्या अकोला मंडळाचे आली आहे.अधीक्षक अभियंतापद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असल्याने या पदाचा प्रभार कार्यकारी अभियंता अजित दिनोरे यांच्याकडे आहे. उपविभाग क्रं. ३ चे अतिरीक्त कार्यकारी अभियंतापद बघणारे अजित दिनोरे यांची कार्यकारी अभियंता म्हणून खामगाव येथे पदोन्नतीवर बदली करण्यात आली होती. अकोला मंडळाचा अभ्यास असणारे दिनोरे यांची प्रशासकीय आणि फिल्ड दोन्ही क्षेत्रात चांगली कारकीर्द राहिली आहे.

# कन्येच्या जन्माने भाग्योदय -पु.गोपाल महाराज

## जवाहर नगरच्या भागवत कथेत होणार रुक्मिणी विवाह





■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

घरी कन्या जन्मास येणे हा त्या घर व कुटुंबाचा भाग्योदय होय.कन्येच्या जन्माने साक्षात भगवती घरी येणे होय.संत म्हणतात,- 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी'सर्व संत व देवतांना जन्म देणारी स्त्री ही महान होय अश्या स्त्रीचा सर्वांनी आदर करून तिला मान प्रतिष्ठा प्रदान करण्याचे प्रतिपादन वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी केले.भागवत सेवा समिती व आशिष पवित्रकार मित्र मंडळाच्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या श्रीमद् भागवत कथेत त्यांनी कथेचे तृतीय पुष्प गुंफ़ले.ते म्हणाले,स्त्रीच्या जीवनात विनय,शील व लज्जा हवी.असे गुण अंगी असणाऱ्या महिलांच्या जीवनात दु:खे येत नाहीत.म्हणून स्त्री ही वंदनीय आहे.ती माता आहे मात्र ती चिंतनीय नाही. तिचे चिंतन न करता भगवंताचे चिंतन करणे योग्य आहे.

स्त्रीच्या चिंतनाने मनात विकार निर्माण होऊ शकतात म्हणून तिला वंदनीय समजून तिचे पूजन हे भाग्य निर्माण करत असल्याचे पु गोपाल म हाराज यांनी यावेळी सांगितले.या सत्रात त्यांनी शिव महात्म्य सांगितले.

## नागरीकांच्या सोयी सुविधा साठी अकोला पोलीस दलात
# सर्व पोलीस स्टेशन ला अभ्यागत कक्षाचे काम प्रगतीपथावर



■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

जिल्हया मधे एकुण २३ पोलीस स्टेशन असुन ४ उप विभाग आहेत, जवळपास १२५ पोलीस अधिकारी व २,५०० पोलीस अंमलदार कार्यरत आहेत. अकोला जिल्हया ची लोकसंख्या जवळपास १८ लाख असुन, मोठया प्रमाणात नागरीक हे कोणती ना कोणती तक्रार / निवेदन / फिर्याद घेऊन पोलीस स्टेशनला येत असतात.

पोलीस स्टेशन मध्ये आलेल्या नागरीकांना पोलीस स्टेशन मध्ये सुसहय व आरामदायी वाटण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर अभ्यागत कक्ष असणे अतिशय गरजेचे होते त्या अनुषंगाने जिल्हा नियाजन समीती आकोला यांचे कडून प्रत्येक पोलीस स्टेशनला एक या प्रमाणे एकुण २३ अभ्यागत कक्ष उभारणी साठी मंजुरी दिली असून त्याचे प्रगती पथावर आहे.. काही पोलीस स्टेशन चे काम अंतिम टप्प्यात आहे.

हेतू-सध्या अस्तिवात असलेल्या पोलीस स्टेशन चे इमारती मध्ये पोलीस स्टेशन चे दैनंदिन कामकाज होईल अशा सुविधा आहेत परंतु रोज पो स्टे ला येणाऱ्या नागरिकांना बसण्या साठी थांबण्या साठी स्वतंत्र व्यवस्था नव्हती. ही अडचण दूर करण्या साठी या अभ्यागत कक्षाची निर्मिती करण्यात येत आहे. जनतेच्या तक्रारीचे निवारणासाठी हे अभ्यागत कक्ष जनतेसाठी वरदान ठरतील.कार्यपध्दती -पोलीस स्टेशनला आलेले नागरीक हे प्रथम अभ्यागत कक्षातील अधिकारी सोबत संवाद साधतील समस्येच्या व अडचणीचे स्वरूपानुसार अभ्यागत कक्ष अधिकारी हे त्यांचे तकारीच निवारण करीता मदत व मार्गदर्शन करतील.

## थोडक्यात

### ई-गव्हर्नन्समध्ये मनपा राज्यात २३ व्या क्रमाकावर

**अकोला :** राज्यातील महापालिकांचा कारभार ई- गव्हर्नन्सला अनुसरून सुलभ करण्यासाठी केंद्र शासनाने डिजिटल इंडिया मोहीम सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अकोला महापालिका २९ राज्यातील महापालिकांपैकी २३ व्या स्थानी असल्याचे पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन पुणे या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. या संस्थेने वेबसाइटवरील उपलब्धता व सेवा तसेच पारदर्शकतौ याचा अभ्यास करून मोबाइल ॲपवरील उपलब्धता, सेवा व पारदर्शकता याचाही अभ्यास केला. मात्र, महापालिकेचे मोबाइल ॲप नसल्याने यामध्ये अकोला महापालिकेला शून्य गुण देण्यात आले आहेत. सोशल मीडिया संदर्भात अकोला महापालिकेला शून्य गुण मिळाले आहेत.

### ३५ रानडुकरांचा कळप अचानक घरात शिरला

**अकोला :** वन विभागाच्या दुर्लक्षामुळे वन्य प्राण्यामुळे अनेकदा सामान्य लोकांना त्रास होत आहे. असा एक प्रकार पातुर तालुक्यातील पिंपळखुटा येथे झाला. या ठिकाणी ३५ रानडुकरांचा कळप अचानक घरात शिरल्याची माहिती समोर आली आहे. अचानक ३५ रानडुक्कराचा कळप एका घरात शिरल्याने घरच्यांची चांगलीच पळापळ झाली. पातुर तालुक्यात पिंपळखुटा गावातील मेहमूद शहा यांच्या घरात आज दुपारच्या सुमारास ३५ रानडुकरांचा कळप अचानक शिरल्याने मोठा गोंधळ उडाला होता. मेहमूद शहा या शेतकऱ्यांना ३५ ही रानटी डूकारांना घरात कोंडून ठेवलं होतं... या संपूर्ण प्रकरणाची वन विभागाला माहिती देण्यात आली.

## ऑनलाइन सट्टा प्रकरणातील मुख्य सूत्रधाराच्या पोलिस कोठडीत वाढ

■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून युवकांना जुगार खेळण्याचे आमिष दाखवून पैसे उकळणाऱ्या आंतरराज्यीय रॅकेटच्या मुख्य आरोपी संजय नामनारायण गुप्ता याला शुक्रवारी पोलिसांनी न्यायालयात हजर केल्यानंतर त्याच्या पोलिस कोठडीत २४ फेब्रुवारीपर्यंत वाढ करण्यात आली आहे. बार्शिटाकळी पोलिसांच्या हद्दीतील कातखेड शिवारातील फार्म हाउसवर १८ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी कारवाई करून आंतरराज्यीय सट्टा रॅकेटचा भंडाफोड केला होता. या कारवाईत ३३ आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय गुप्ता, फार्म हाउस मालक रवींद्र विष्णुपंत पांडे, अशोक जोशी (गुजरात), राहुल लांबट (मुंबई) आणि राज पासवान (उत्तर प्रदेश) यांना १९ फेब्रुवारी रोजी बार्शिटाकळी न्यायालयात हजर केल्यावर त्यांना २१ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. यानंतर, या कोठडीचा कालावधी संपल्यावर, आरोपी संजय गुप्ता याची पोलिस कोठडी २४ फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## सनदी लेखापाल अकोला शाखेच्या कार्यकारिणी मंडळाची अविरोध निवड



■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउन्टन्स ऑफ इंडिया, अकोला शाखेच्या २०२५-२९ या ४ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यकारिणी मंडनची अविरोध निवड झाली. अध्यक्ष: सीए धीरज चांडक, उपाध्यक्ष: सीए. रोमील सोजतीया, सचिव: सीए श्याम माहेश्वरी, ट्रेझरार: सीए. विशाल राजपाल, विकासा अध्यक्ष : सीए प्रतिक मंत्री, कार्यकारिणी सदस्य : सीए मनोज चांडक, मावळते अध्यक्ष सीए सुमित अलिमचंदानी यांनी नुतन अध्यक्ष सीए धीरज चांडक यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच भविष्यात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

नूतन अध्यक्ष सीए धीरज चांडक यांनी सनदी लेखापाल व विद्यार्थी यांच्या सर्वांगीण विकासाकरिता तसेच जनतेसाठी विवीध सम ाजपयोगी कार्यक्रम राबविण्याचे आश्वासन दिले.

निवडणुक अधिकारी म्हणून सीए प्रकाश भंडारी यांनी कामकाज केले. असे अकोला शाखेचे जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सीए. रमेश चौधरी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्राद्वारे कळविले.

## २४ आणि २५ मार्च रोजी बँकांचे कामकाज बंद

■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

बँका मधील कर्मचारी भरती बंद आणि महत्त्वाची कामे आऊटसोर्सिंग द्वारे करण्यात आहेत. चुकीच्या बँकिंग धोरणाचा विरोध म्हणून युनायटेड फोरम ऑफ बँक असोसिएशनच्या माध्यमातून बँक ऑफ महाराष्ट्रच्या राधाकिसन प्लांट मधील शाखेसमोर निदर्शने करण्यात आली.

आणि व्यवस्थापनाच्या विरोधात २४ आणि २५ रोजी बँकांचे कामकाज बंद ठेवण्यात येणार आहे. संघटनेचे नेते या बाबतीत जागृती करीत आहेत. कर्मचारी एकता जिंदाबाद अशी फलके कर्मचाऱ्यांच्या हाती होती. कर्मचारी भरती बंद भरती बंद करून आऊटसोर्सिंग द्वारे कामे केली जात आहेत. कोअर कामे देखील त्यांच्या कडून करण्यात येत असल्याने आर्थिक गैरव्यवहार वाढले आहे. अशा चुकीच्या धोरणामुळे बँका अडचणीत आलेल्या आहेत असाआरोप युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनचे जॉइंट सेक्रेटरी देवीदास तुळजापूरकर यांनी केला. विविध आंदोलनात कर्मचाऱ्यांनी एकजूट ठेवून सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. आले. आंदोलनात कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शंकरपटाची परंपरा चीखलगावात पीढीजात सुरु असून त्यांसाठी आयोजकाचा गौरव करणे हे आपले कर्तव्य : आ. सावरकर





■**अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)**:

कॉग्रेसच्या काळात परंपरा खंडित झाली होती परंतु महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवाभाऊ फडणवीस यांनी या परंपरेसाठी हायकोर्टातून निर्णय आणून भव्य जंगी शंकरघूपट ही परंपरा मराठी माणसाची संस्कृती उत्सव साजरा कायम ठेवून महायुती सरकार सर्वसामान्यांना घेऊन चालणार असून अकोला जिल्ह्यात चिखलगाव सामाजिक सांस्कृतिक साहित्य,राजकीय शैक्षणिक धार्मिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असून वेगळेपणा दाखवून समाजाला दिशा देण्याचे काम चिखलगावकर करत असतात ही परंपरा त्यांनी जंगी शंकर पट परंपरा केल्या चार पिढीपासून जोपासली यासाठी त्यांचा गौरव करणे सन्मान करणे हे आपले कर्तव्य असल्याची प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी केले. चिखलगाव येथे दोन दिवसीय शंकर पटाचे शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. गेल्या चार पिढीपासून सातत्याने संस्कृती धार्मिक शैक्षणिक अध्यात्म साहित्य क्षेत्रामध्ये तसेच क्रीडा क्षेत्रामध्ये व ग्रामीण संस्कृती जतन करण्याचं काम करणाऱ्या परिवाराचा आदर्श जिल्ह्यात सर्व नागरिकांनी घ्यावं व शंकरपट हे ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजप नेते तेजराव थोरात, डॉक्टर शंकरराव वाकोडे, माधव मानकर विठ्ठल चतरकर अंबादास उमाळे रवी गावंडे राजेश ठाकरे विठ्ठल थोरात विलास मेतकर अशोक मेतकर सचिन पाटील किरण तेजराव थोरात, सागर साबळे शिवा पाटील सचिन फ्रेंड अनिल थोरात, राजेश यादव, एडवोकेट अभय थोरात नामदेव ढगे पुरुषोत्तम साबळे भारत ठाकूर अशोक मेतकर अनिल मेतकर विजय तायडे विठ्ठल पाटील राजू थोरात शिरसागर वानखडे प्यारेलाल केवट सागर सराफ नितीन थोरात विकी तायडे नितेश चव्हाण डॉक्टर शेंडे डॉक्टर केशव डहाके गजू यादव सतीश थोरात दिगंबर कोगदे मालेगाव आगरकर सागर मेतकर विनोद चांदुरकर मुन्ना यादव अश्विन वानखडे तुकाराम अंजन सोंडे निलेश चव्हाण रवी थोरात, नकुल थोरात आशिष थोरात संतोष राव हेमंत थोरात वैभव राव सरप विनोद जाधव सुरेश कुबेर विजय डागापुरे प्रसन्न काकड मुन्ना यादव अभिजीत वानखडे योगेश साबळे विशाल कोगदे माधराव आगरकर विठ्ठल पाटील आधी उपस्थित होते. मोठ्या प्रमाणात शंकरपटामध्ये बैलजोडी आली असून सातत्याने शंकरपट भरवणारा चिखलगाव यासाठी प्रसिद्ध आहे.

